● शनिवार, दि. २१ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १४३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जिल्ह्यात अवैध व्यवसाय जोमात!


## गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहिलेला नाही?

**दीपक शेळके**

**जालना -** जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व विक्री, हातभट्टीची विक्री व वाहतुक, सट्टा-मटका, ऑनलाईन लॉटरी, प्रतिबंधीत गुटखा विक्री बिनधास्तपणे सुरु असल्याचे चित्र आहे. पोलीसांकडून कधी कधी कारवाई होत असतांनाही कोणताच अवैध प्रकार बंद झालेला नाही हे विशेष. सट्टा-मटक्यासह ऑनलाईन पद्धतीने लॉटरीच्या माध्यमातून लाखोंची उलाढाल होत असल्याची चर्चा असून त्यावर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही.

लोकांकडून पैसे घेऊन त्याच पैशांवर अंक अथवा अंदाजित आकड्यावर पैज लावून सट्टा-मटका-ऑनलाईन लॉटरी बिनधास्तपणे खेळली तसेच खेळवली जात आहे. सार्वजनिक ठिकाणी उपद्रव निर्माण केल्याप्रकरणी पोलीस कारवाई काही ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात येतात. तर काही ठिकाणी तर केवळ कारवाई दाखवायचीयं म्हणून देखील गुन्हे दाखल होत आहेत. यात मुख्य सुत्रधार बाजुला ठेवल्या जातो व त्या ठिकाणचा एखादा काम करणाऱ्या व्यक्तीच्या नावाने गुन्हा रजिस्टर केला जातो. जिल्ह्यात जवळपास सर्वच तालुक्यात शहरात या अवैध धंद्याने चांगलेच बस्तान बसविलेले दिसून येत आहे.

या धंद्यात दिवसाकाठी लाखोंचा व्यवहार होत आहे. अनेक तरुण मंडळी त्यांच्या आहारी जात आहेत. काही चहाच्या हॉटेलच्या बाजुला, पान शॉपजवळ, मार्केट परिसरात, गल्ली-बोळात, बस








स्थानक परिसरात, बार-वाईन शॉप जवळ हे अवैधरित्या सुरु आहे.

जिल्ह्यात १९ पोलीस ठाणे असून यात सदर बाजार, कदीम जालना, तालुका जालना, चंदनझिरा, बदनापूर, भोकरदन, जाफ्राबाद, टेंभुर्णी, हसनाबाद, पारध, मंठा, परतूर, मौजपुरी, आष्टी, सेवली, अंबड, घनसावंगी, गोंदी, तिर्थपुरी या पोलीस ठाण्याचा समावेश आहे. तसेच पोलीस हेड क्वार्टर, कंट्रोल रुम, लोकल क्राईम ब्रँच, डिस्ट्रीक्ट स्पेशल ब्रँच यासारख्या ब्रँचेस कार्यरत आहेत. असे असले तरी जिल्ह्याभरातील अवैध धंदे थांबविण्यात पोलीसांना अद्यापही यश मिळत नाही, ते का? हे न उलगडणारे कोडे मुळीच नाही.

विविध प्रकारचा सट्टा-मटका-ऑनलाईन लॉटरी हे हायटेक प्रणालीचा वापर करत आहेत. पुर्वी चिठ्ठींच्या रुपाने कल्याण-मुंबई मटका सुरु असायचा आता या काही ठिकाणचा अपवाद वगळता चिट्ठ्यांऐवजी मोबाईल वापरणे सुरु झाले आहे. व्हॉटस्अप, टेलीग्राम यासारखे सोशल माध्यमे वापरून हा खेळ खेळला जात आहे. व्हॉटस्अप पेक्षा अधिक टेलीग्रामवर तर विविध ग्रुप यासाठी कार्यरत आहेत. कुठे कोणता आकडा खेळावा याचा अंदाज व्यक्त करणारेही विविध ग्रुप या माध्यमांवर सक्रिय आहेत. अंदाज व्यक्त करणारी ग्रुपही नागरिकांकडून बक्कळ पैसे उकळत आहेत.

संगणकावर कल्याण, मुंबई, सुरत अशा विविध शहर वा इतर नावांनी तसेच १०,११, १२, १३, १४, १५, १६, १७,... अशा आकड्यांमध्ये हा खेळ सुरु आहे. २ रुपयांच्या बदल्यात पंधरा-सोळा पटीने पैसे देण्याचे अमिष या ठिकाणी दिल्या जात आहे. पंधरा-पंधरा मिनीटाला वेगवेगळ्या नावाने हा आकड्याचा खेळ होत आहे.

मोबाईल वॉलेटवर पैसे घेणे-देणे सुरु आहे. एकीकडे शासन अवैध व्यवसाय बंद करण्यासाठी विविध कायदे करते आहे. सध्याचे सरकार तर पेपर लॉटरीही बंद करण्याच्या उद्देशाने पाऊले उचलत असल्याचे कळते आहे. तर दुसरीकडे त्याची अंमलबजावणी मात्र होतांना दिसत नाही. अशा अवैध धंद्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

अनेक गुन्ह्यांचा तपास व गुन्हेगारांच्या शोधाच्या निमित्ताने जागोजागी खबरी आहेत. तरीदेखील अशा अवैध व्यवसायाची माहिती पोलीसांपर्यंत पोहचत का नाही? असा प्रश्न जिल्ह्यातील नागरिकांच्या मनात आहे. कारवाईत सातत्य राहील्यास मुख्य सुत्रधार तसेच चालक- मालकांवर गुन्हे दाखल झाल्यास चित्र बदलले दिसू शकते तसेच गुन्हेगारी वाढण्यास अवैध व्यवसाय हे एक प्रमुख कारण आहे, त्यामुळे सामाजिक शांतता व सुव्यवस्थेसाठी अवैध धंद्यांना वेळीच लगाम घालणे आवश्यक आहे.

या व्यतिरिक्त प्रतिबंधित गुटखा विक्री, अवैध वाळु उत्खनन व विक्री, हातभट्टी विक्री व वाहतुक असे अवैध व्यवसाय करणाऱ्या चालकांना व गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहिला नसल्याचे चित्र आहे. पोलीस अधिक्षक व जिल्ह्यातील १९ पोलीस ठाण्यांचे पोलीस निरीक्षक हे अवैध व्यवसाय, खेळ गांभीर्याने घेऊन हे व्यवसाय पूर्णतः बंद करतील का? मोठे किंग, चालक-मालक यांना पकडण्यासाठी जाळे टाकतील का? याकडे जिल्ह्यातील जनतेचे लक्ष लागून आहे.

## पोलीसांना हफ्ते सुरु असावेत का?

अवैध धंद्यांच्या बाबतीत नेहेमीच पोलीस टार्गेट करण्यात येतात. मुळात पोलीसांना हफ्ते सुरु असल्यामुळेच असे अवैध व्यवसाय पुर्णपणे बंद होत नाही असे बोलल्या जाते. मात्र, ही बाब किती प्रमाणात सत्य आहे, कि पोलीसांना केवळ बळीचा बकरा बनविले जाते? याचा विचार होणे आवश्यक आहे. आमच्या प्रतिनिधींनी पत्रकार नसल्याचे भासवून अशा विविध अवैध व्यवसाय चालक-मालकांशी चर्चा केली. त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवल्यास पोलीसांना हफ्ते द्यावे लागते हे स्पष्ट होते. जर असे असेल तर जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध व्यवसाय कधीही बंद होणार नाहीत. अनेकांनी सांगितले की काही वेळेस कारवाई दाखविण्यासाठी गुन्हे दाखल केले जातात अशा वेळी हे चालक-मालक त्यांच्याकडे कामावर असलेल्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याचे सांगतात. अवैध वाळु व्यवसायात जे टिप्पर चालतात ते त्या तर पोलीसांकडुनच त्यांना ऑफर दिल्या जाते. दोन टिप्पर वर एक टिप्पर फ्री, चार टिप्परवर एक फ्रि, म्हणजे दिवसात जर वाळुच्या दहा-बारा टिप्परच्या फेऱ्या करायच्या झाल्यास केवळ सात-आठ टिप्परचे जे काय ठरलेले आहे तेवढेच द्यायचे बाकी टिप्पर फ्री. प्रतिबंधीत गुटखा विक्री व वाहतुकीकतही अशाच पद्धतीचा अनुभव येत असून येथे तीन-चार वेगवेगळे गुटखा किंग आहेत. काही अनुभवी तर काही नविन आहेत. कारवाई दाखविण्यासाठी अनेक वेळा पकडलेल्या गुटखा मालापैकी कमी माल दाखविण्याचा पर्याय असतो. तर काहींना राजकीय वरदहस्त प्राप्त असल्याचे दिसून येते आहे. आता अशा रितीने कारवाई होत असेल तर खरचं अवैध व्यवसाय बंद होतील का?

# ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची जेईएफ शिष्यवृत्ती-प्रा. लाहोटी

## चार वर्षात ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना १ कोटी १५ लाखाची शिष्यवृत्ती

**जालना । प्रतिनिधी -** जेईएफ शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील वैद्यकीय, अभियांत्रिकी, वाणिज्य आदी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली असून, शिष्यवृत्ती प्रदान सोहळा रविवार दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख वक्ते म्हणून निर्माण युवा उपक्रम व सर्च फाउंडेशन गडचिरोलीचे सहसंचालक अमृत अभय बंग तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी



डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांनी दिली.

जेईएफ शिष्यवृत्ती योजनेची माहिती देण्यासाठी जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत प्रा. लाहोटी बोलत होते. यावेळी फाउंडेशनचे सचिव सुरेश कुलकर्णी-केसापूरकर, मार्गदर्शक प्रा. ओमप्रकाश झांजरी, प्रा. राहुल लाहोटी, प्रा. स्वप्निल सारडा, मोफत जेईएफ कोचिंग प्रकल्पाचे विभाग प्रमुख प्रा. संतोष जाधव, दिलीप केंद्रे, रुक्मिणीकांत दीक्षित यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रा. लाहोटी पुढे म्हणाले की, आर्थिक दुर्बल घटकातील गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या आड आर्थिक अडचण येऊ नये म्हणून गेल्या ४ वर्षापासून जेईएफ शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. पहिल्यावर्षी १२४ विद्यार्थ्यांना १७ लाख २५ हजार रुपये, दुसऱ्या वर्ष १९० विद्यार्थ्यांना २६ लाख ११ हजार ३५१ रुपये, तिसऱ्यावर्षी २७१ विद्यार्थ्यांना ३१ लाख १७ हजार शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावर्षी ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची शिष्यवृत्ती येत्या रविवारी प्रदान करण्यात येत आहे. चार वर्षात ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना १ कोटी १५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती पान २ वर

### गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा मंठा येथे निषेध

# शहांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा - ए.जे. बोराडे




**मंठा । प्रतिनिधी -** संसदेत संविधानावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी केलेल्या विधानाच्या निषेधार्थ मंठा येथे जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी जनतेने तसेच नगरसेवक व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांचा निषेध व्यक्त करताना ए.जे.बोराडे म्हणाले की, अमित शहा यांना सत्तेचा माज चढला असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा देशातच नव्हे तर जगात आदर केला जातो. अशा या महान संविधानाबद्दल अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जनता त्यांना कदापिही माफ करणार नाही. त्यांच्या वक्तव्याचा संपूर्ण जगात निषेध व्यक्त होत आहे. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी श्री बोराडे यांनी यावेळी केली. भंते संघरक्षित यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल देशाची माफी मागावी अशी मागणी भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले व आसाराम साबळे यांनी केली. यावेळी संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अमित शहा हाय हाय, अमित शहांचे करायचे काय खाली मुंडके वर पाय, माफी मांगो माफी मांगो, अमित शहा माफी मांगो, संविधानाचा विजय असो अशी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे तसेच नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार श्रीमती सोनाली जोंधळे यांना निवेदन दिले. यावेळी भंते संघरक्षित, नगरसेवक अरुण वाघमारे, भीम शक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले, माजी सभापती संतोष वरकड, बालासाहेब बोराडे, जे.के. कुरेशी, नितीन राठोड, अचित बोराडे, प्रदीप बोराडे, बाजभाई पठाण, विकास सूर्यवंशी, उबेद बागवान, शरद मोरे, श्रीमती सारिका वरणकर, आसाराम चोरमारे, गंगाराम गवळी, आसाराम साबळे, सुरेश वाव्हळे, अशोक अवचार, रंगनाथ वटाणे, धोंडोपंत मानवतकर, दिगंबर बोराडे, भीमराव वाघ, विलास काऊतकर, विजेश वाघमारे, अंबादास घायाळ, मारुती खनपटे, नानासाहेब बोराडे, प्रताप जाधव, धम्मा वाघमारे, करण वटाणे, पवन वाघमारे, अक्षय श्रदीप वाघमारे, उद्धव सरोदे, पप्पू दायमा, समाधान शिंदे, नंदकिशोर प्रधान, मोसिन कुरेशी, जिजाभाऊ देशमाने, महेंद्र मोरे, गितेश वाघमारे, स्वप्निल गोंडगे, स्वप्निल खंदारे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### परभणी प्रकरणी जिल्हा व्यापारी महासंघाकडून निषेध

# बंद काळात समयसूचकता बाळगण्याचे व्यापाऱ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** परभणी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिमेची तोडफोड करून विटंबना केल्याच्या घटनेचा तसेच पँथर नेते सोमनाथ सूर्यवंशी यांच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल महासंघाने दुःख व्यक्त केले असून, त्यांच्या मृत्यूची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या घटनेमुळे समाजातील शांतता व सौहार्द बिघडवण्याचा प्रयत्न झाला असून, दोषींवर कठोर कारवाई होणे अत्यावश्यक आहे. महासंघाने या घटनेतील गुन्हेगारांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये. दरम्यान, शहरातील काही संघटनांनी २१ डिसेंबर, शनिवार रोजी जालना शहर बंदचे आवाहन केले आहे. जालना जिल्हा व्यापारी महासंघ नेहमीच धार्मिक किंवा सामाजिक प्रकरणांमध्ये शांतता व संयमाचे आवाहन करत असतो. या पार्श्वभूमीवर, महासंघाने व्यापाऱ्यांना समयसूचकता पान २ वर

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी


**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी ख्रिसमस (नाताळ) साजरा होणार आहे. या दिवशी चर्चमध्ये विशेष प्रार्थना व आनंदोत्सव साजरा केला जातो. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२४ हा वर्षाचा शेवटचा दिवस तर दि. १ जानेवरी २०२५ रोजीचा दिवस हा नुतन वर्षाचे स्वागत म्हणुन साजरा केला जातो. या दिवशी जालना शहर व संपुर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लोक एकत्र येवून उत्साह साजरा करतात. नवीन वर्षाचे स्वागत म्हणुन विविध कार्यक्रम, नाचगाणे, डिजे वाजून डान्स करणे, फटाके फोडणे, रोषणाई करणे, हॉटेल व धाबे, शहरातील महत्वाच्या ठिकाणी पर्यटन स्थळे इत्यादी ठिकाणी लोकांचा जमाव एकत्र येवून विविध कार्यक्रम आयोजन करण्यात येते. सदर कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत सुरु असतो. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी वर्ष अखेर व दि. १ जानेवारी २०२५ जानेवारी जयस्तंभ भिमा कोरेगाव शौर्यदिन निमित्ताने पान २ वर

# संपादकीय

पान

## चटका लावून जाणारी निवृत्ती

भारताचा अव्वल ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विन याने ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या कसोटी नंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधून निवृत्तीची घोषणा केली. रविचंद्रन आश्विन याच्या निवृत्तीच्या घोषणेने क्रिकेट रसिकांना धक्का बसला कारण त्याची निवृत्ती अनपेक्षित होती. आश्विन असा काही निर्णय घेईल असे कोणालाच वाटले नव्हते कारण त्याच्यात अद्याप बरेचसे क्रिकेट शिल्लक होते. जरी तो आज ३८ वर्षाचा असला तरी तरी तो फिट आणि फॉर्मात होता. सहा महिन्यांपूर्वीच इंग्लंड विरुद्धच्या राजकोट कसोटीत त्याने ५०० बळींचा टप्पा गाठत विक्रमी कामगिरी केली होती. कसोटी क्रिकेटमध्ये पाचशे बळी घेणारे मोजकेच गोलंदाज आहेत त्यात आश्विनचा समावेश झाला होता. भारताच्या दृष्टीने पाहायला गेले तर कसोटीत पाचशे बळी मिळवणारा तो भारताचा दुसराच गोलंदाज आहे. या आधी अशी कामगिरी भारताचा महान लेगस्पिनर अनिल कुंबळे यालाच करता आली आहे. आश्विनने ५३७ कसोटी बळी घेतले आहेत आणि त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळे होता अनिल कुंबळे याने कसोटीत ६१९ बळी घेतले आहेत याचाच अर्थ दोघांमध्ये आता फक्त ८२ बळींचे अंतर होते. आश्विन आता ३८ वर्षाचा आहे. त्याचा फॉर्म आणि फिटनेस उत्तम आहे त्यामुळे तो आणखी एक दीड वर्ष सहज खेळू शकला असता. तो जर आणखी एक दीड वर्ष खेळला तर तो अनिल कुंबलेला मागे टाकून भारताकडून सर्वाधिक बळी मिळवणारा गोलंदाज ठरला असता. मात्र त्याने त्याची वाट न पाहता निवृत्ती घोषित केली त्यामुळेच त्याची निवृत्ती क्रिकेट रसिकांना चटका लावून गेली. अर्थात त्याच्या या कृतीतून त्याच्या विषयीचा आदर आणखीन वाढला. आपण विक्रमासाठी नाही तर देशासाठी खेळलो हे त्याने कृतीतून सिद्ध केले. रविचंद्रन आश्विन हा जगातील सर्वाधिक धोकादायक गोलंदाज समजला जात असे. विशेषतः भारतीय खेळपट्ट्यांवर तर तो अधिक धोकेदायक ठरत असे. त्याने मिळवलेल्या ५३७ बळीपैकी ३८३ बळी त्याने भारतात घेतल्या आहेत. परदेशातही त्याची कामगिरी चांगली आहे. परदेशातही त्याने बळी मिळवलेले आहेत. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध त्याने सातत्याने चांगली गोलंदाजी केली आहे. त्याने केवळ गोलंदाज म्हणून नाही तर फलंदाज म्हणूनही चांगली कामगिरी केली आहे. कसोटीत त्याने सहा शतके झळकावली आहेत. कसोटीत सहा शतके झळकावणे ते ही सातव्या, आठव्या क्रमांकावर येऊन ही साधी गोष्ट नाही. कसोटीत ५०० बळी आणि ६ शतक झळकावणारा तो एकमेव खेळाडू आहे. अशी कामगिरी एक चांगला अष्टपैलू खेळाडूच करू शकतो. आश्विनने हे करून आपण केवळ गोलंदाज नसून अष्टपैलू खेळाडू आहोत हे सिद्ध केले आहे. आश्विनने कसोटीत ११ वेळा मालिकाविराचा पुरस्कार जिंकला आहे हा देखील एक विक्रमच आहे. मागील दशकभरात भारताने कसोटीत जे वर्चस्व गाजवले त्यामागे आश्विन हे एक महत्वाचे कारण आहे. आश्विनने केवळ कसोटीतच नाही तर एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही चमकदार कामगिरी केली. एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने खूप बळी मिळवले आहे. कसोटी प्रमाणेच एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. आश्विन हा भारताचा खराखुरा मॅच विनर खेळाडू आहे. २०११ साली जेंव्हा त्याने भारताकडून कसोटीत पदार्पण केले तेंव्हा अनिल कुंबळे निवृत्त झाला होता तर हरभजन सिंगचा उतरता काळ सुरू झाला होता. या दोघांनी जवळपास दीड दशके भारतीय फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळली होती त्यांच्या नंतर भारतीय फिरकीची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न होता कारण त्यावेळी त्यांची जागा घेणारा तर सोडाच पण त्यांच्या जवळपास जाऊ शकणारा एकही फिरकी गोलंदाज दिसत नव्हता. आश्विन ज्यावेळी आला त्यावेळीही तो इतकी मोठी मजल मारेल असे भाकीत कोणी केले नव्हते मात्र त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले आणि भारताला अनेक अप्रतिम विजय मिळवून दिले. त्यामुळेच तो आज महान गोलंदाजांच्या पंगतीत जाऊन बसला. रविचंद्रन आश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी देशांतर्गत क्रिकेट ही गाजवून सोडले होते. त्याने रणजी सामन्यात सातत्याने बळी मिळवले मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिली ती आयपीएलने. आयपीएलमध्ये आश्विनने चेन्नई सुपर किंग्जचे प्रतिनिधीत्व केले. मुथय्या मुरलीधरन हा चेन्नई सुपर किंग्जचा प्रमुख गोलंदाज होता. कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गोलंदाजीची सुरुवात फिरकीने करायची होती मात्र मुरलीधरन सुरुवातीलाच गोलंदाजी करण्यास तयार नसल्याने धोनीने चेंडू आश्विनकडे सोपविला. आश्विनने संधीचे सोने करीत प्रतिस्पर्धी संघाची सलामीची फळी कापून काढण्याची कामगिरी केली आणि तिथेच धोनीचा आश्विनवर विश्वास बसला. आयपीएलमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केल्याने धोनीने त्याला भारताकडून खेळायची संधी दिली. आश्विनने धोनीने टाकलेला विश्वास सार्थ ठरवला आणि भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले. कसोटीत तर त्याने करामत केली. खेळपट्टी कुठलीही असो आपल्या फिरकीने आश्विन त्यावर रंग भरत असे. त्याच्या बोटांमध्ये जादू होती. त्याच्याकडे शेन वॉर्न सारखे ग्लॅमर नव्हते, मुथय्या मुरलीधरन सारखी दहशत त्याच्याकडे नव्हती, कुंबळे, हरभजनसिंग सारखी लोकप्रियता देखील त्याला मिळाली नाही तरीही तो या दिग्गजांच्या पंगतीत जाऊन बसला कारण त्याची शैली वेगळी होती. त्याने कोणाचीही कॉपी केली नाही. त्याने स्वतःची वेगळी शैली विकसित केली. जगातील एक सर्वोत्तम हुशार फिरकी गोलंदाज म्हणून त्याने अल्पावधीतच ख्याती मिळवली. कारण चेंडू बोटांनी, मनगटांनी वळत असला, तरी आधी डोक्यात तो समोरच्या फलंदाजाला कसा टाकायचा याचे चित्र तो आधीच तयार करून ठेवायचा म्हणूनच त्याच्या चेंडूचा सामना करताना भल्या भल्या फलंदाजांची भंभेरी उडायची. तो आपल्या गोलंदाजीत सतत नवनवीन प्रयोग करायचा. आर्म बॉल, कॅरम बॉलचा तो खुबीने वापर करायचा. ऑफ स्पिनर असूनही तो मध्येच लेगब्रेक आणि गुगली टाकायचा त्यामुळे फलंदाजांची दांडी गुल व्हायची. त्याने आता निवृत्ती स्वीकारल्याने त्याची ती गोलंदाजी पुन्हा पाहायला मिळणार नाही अर्थात तो आयपीएल आणि क्लब क्रिकेट खेळेल पण चार षटकांच्या क्लब क्रिकेट मधील त्याच्या गोलंदाजीला कसोटी क्रिकेट मधील गोलंदाजीची सर येणार नाही. कसोटीत त्याची उणीव नेहमीच जाणवत राहील. त्याच्या तोडीचा तर सोडाच त्याच्या जवळपास पोहचू शकेल असा कोणताच गोलंदाज आज भारतात नाही त्यामुळेच त्याच्या निवृत्तीने भारतीय क्रिकेट मध्ये मोठी पोकळी निर्माण होणार आहे. निवृत्ती नंतर रविचंद्रन आश्विनने त्याची ऑफ स्पिनची कला तरुण, युवा होतकरू खेळाडूंना शिकवावी आणि त्याच्यासारखे खेळाडू त्याने देशाला निर्माण करून द्यावेत हीच त्याच्याकडून क्रिकेट रसिकांची अपेक्षा आहे रविचंद्रन आश्विनला निवृत्ती नंतरच्या आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# एसटी प्रवास भाड्यात वाढ करून प्रवाशांवर जास्तीचा बोजा लादु नका !

सरकारने एसटी प्रवास भाडे कमी करण्यापेक्षा भरमसाठ वाढ करीत आहे ही बाब सर्वसामान्य प्रवाशांना न झेपणारी आहे. प्रवासभाड्यात १ किंवा २ टक्के वाढ कोणीही मान्य करू शकते व सहन करू शकते.परंतु प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली परिवहन महामंडळ जर १४.९५ टक्के प्रवास भाडे वाढ करीत असेल तर ही बाब सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण सरकारने अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे स्वागतच. परंतु प्रवाशांच्या सुविधांच्या नावाखाली सर्वसामान्यांची दिशाभूल करू नये. प्रवाशांना किंवा नागरिकांना सुविधा देणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते. त्यापध्दतीने सरकारला नियोजन सुध्दा करावे लागते ही बाब सत्य आहे.परंतु सरकार जर अचानक १४.९५ टक्के एवढी भरमसाठ वाढ करीत असेल तर असे म्हणायला हरकत नाही की सरकारने लागू केलेल्या अनेक योजनांची वसुली तर करीत नाही ना! अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात येईल.कारण प्रवाशांच्या सुविधांसाठी १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ ठीक आहे.यातुन महामंडळ चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करु शकते.त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने १४.९५ टक्के प्रवास भाडे यावर गांभीर्याने विचार करावा.कारण सरकार जेव्हा अनेक सुविधा नागरिकांना प्रदान करतात. तेव्हा त्याचा प्रथम विचार करायला हवा. अचानक जर आपण अवाढव्य भाडेवाढ करण्याचा विचार केला तर अनेकांची बोटे महामंडळ व सरकारवर उठतील. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने भाडे वाढीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. एसटी महामंडळाच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नव्या वर्षात ३५०० नव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहे ही आनंदाची बाब आहे व याचे स्वागतच.कारण राज्यात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे १४.९५ टक्के भाडे वाढ ही बाब बरोबर नाही. राज्यात एसटी महामंडळाच्या १४ हजार बसेस धावतात यात ३५०० नवीन बसेस येतील यामुळे प्रवाशांना सुविधा उपलब्ध अवश्य होईल यात दुमत नाही. परंतु प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून याचा संपूर्ण भुर्दंड प्रवाशांवर लादु नये. शासनाने आपला खर्च कमी करावा, सरकारच्या अनेक कारवाईच्या मार्फत सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणात काळा पैसा आलेला आहे त्याचा वापर यासाठी करावा, त्याचप्रकारे अनेक प्रकारचे कर जमा होतात त्यातून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्यावी व प्रवाशांकडून हातभार म्हणून १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ करून सुविधा उपलब्ध करून द्यावी. यामुळे सरकार व प्रवासी यांच्यात समतोल राहील.राज्यातील अनेक बसस्थानकांचा चेहरामोहरा बदलणार ही आनंदाची बाब आहे याचे स्वागतच.परंतु सरकार जेव्हा अनेक योजना राबविते तेव्हा सरकारजवळ आपोआप पैसे येतो आणि जेव्हा प्रवाशांना सुविधा देण्याचा निर्णय सरकार घेते तेव्हा सरकार प्रवाशांजवळुन १४ .९५ टक्के भाडे वाढ करून सुविधा देण्याची गोष्ट करते हे योग्य नाही.एसटी प्रवाशांना सुविधा अवश्य द्या परंतु अवाढव्य भाडेवाढ करून नाही तर समतोल राखुन.प्रवाशांना एसटी प्रवासात सवलत द्यायची सोडून सुविधांच्या नावाखाली भरमसाठ वाढ करून गरीब प्रवासी, शेतकरी, सर्वसामान्यांना सरकार लुटते की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे. सरकारला व महामंडळाला एसटी प्रवाशांना खरोखरच सुविधा द्यायची असेल तर एखाद्या योजनेअंतर्गत द्यावी व एक किंवा दोन टक्के भाडेवाढ करून सरकारने प्रवाशांकडून मदत घ्यावी व एसटीचा आणि बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलवावा आणि संपूर्ण महाराष्ट्रात एसटी महामंडळाने आपले आगळेवेगळे स्थापन प्रस्थापित करावे. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# वंचित बहुजन आघाडीचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने

**मंठा । प्रतिनिधी -** वंचित बहुजन आघाडीचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात निदर्शने व निषेध करून नायब तहसीलदार कल्याण काळदाते यांना निवेदन निवेदनात असे म्हटले आहे की केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी त्यांच्याकडील गृहमंत्री पदाचा राजीनामा घेवून त्यांना कार्यमुक्त करणे बाबत.




निवेदनात पुढे असे म्हटले आहे की केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अवमान करणारे बेताल वक्तव्य केले आहे. सदरील व्यतक्त्याचा वंचित बहुजन आघाडी तर्फे जाहीर निषेध करण्यात येत आहे.

ज्या संविधानाची शपथ घेवून अमितशाह गृहमंत्री झाले ज्याच राज्यघटनेच्या शिल्पकाराचा अवमान त्यांनी केला आहे त्यामुळे तडीपार अमित शाह यांना गृहमंत्री पदावर राहण्याचा काही अधिकार नाही त्यांना आता जपतप करण्याकरिता त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नामस्मरण करण्याकरिता व स्वर्गात जाण्याकरिता मुक्त करावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडी पक्षातर्फे शासनाकडे या व्दारे करण्यात येत आहे.

या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे डॉ.किशोर त्रिभुवन,सुभाष जाधव,भारत उघडे,आशिष मोरे,राजू जाधव,साईनाथ मोरे,सिद्धार्थ वाघमारे,किशोर वाघमारे व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपस्थित होते

## पान १ वरुन

### ३०५ विद्यार्थ्यांना ...

प्रदान करण्यात आली असून, महाराष्ट्रात जिल्हा पातळीवर राबवली जाणारी ही सर्वात मोठी शिष्यवृत्ती योजना ठरत असून, दानदात्यांच्या योगदानामुळे प्रत्येकवर्षी या योजनेचा विस्तार होत चालला आहे. यावर्षी पॉलिटेक्निकच्या २५२, इंजिनिअरिंगच्या १३, एमबीबीएसच्या ३, बीएससी नर्सिंगच्या ८, बी. फार्मसीच्या २, कॉमर्सच्या ११, बीएससी ॲग्रीच्या ४ तर स्टाफच्या विविध अभ्यासक्रमाचे पाल्य अशा १२ जणांची शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड करण्यात आली. शिष्यवृत्तीची रक्कम अभ्यासक्रमानुसार १० हजार ते २५ हजारापर्यंत आहे. गेल्या ४ वर्षात ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. जालना शहरातील दानशुरांच्या आर्थिक सहयोगामुळेच हे सर्व शक्य झाले आहे. त्यामुळे आम्ही या सर्वांचे शतशः आभारी आहोत, असे ते म्हणाले.

यावेळी सचिव सुरेश कुलकर्णी यांनी जालना फाउंडेशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या पायाभूत साक्षरता अभियान पढो जालना, मोफत कोचिंग प्रकल्प, मोफत बेसिक कम्प्युटर, टॅली व इंग्लिश स्पीकिंग कोर्स, सायन्स सेंटर (विज्ञान शोधवाटीका), विद्यार्थ्यांना सायकल वाटप, इंग्रजी-मराठी शब्दकोश कार्यक्रम, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेशासाठी निशुल्क कौन्सिलिंग, मध्यान्ह भोजन आदी उपक्रमांची विस्तृत माहिती दिली.

शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनीलभाई रायठठ्ठा, उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी, विश्वस्त सुनील गोयल, दिलीप कुलकर्णी, डॉ. हितेश रायठठ्ठा, गोविंद काबरा यांनी केले आहे.

**राबविण्यात येणारे विविध उपक्रमः**

१. पायाभूत साक्षरता अभियान पढो जालनाः जालना जिल्ह्यातील अध्यपिक्षा अधिक विद्यार्थी अप्रगत आहेत, भागाकार, गुणाकार, वजाबाकी या गणितीय क्रिया करता न येणे, इंग्रजीचे जोडशब्द बायता न येणे यास अप्रगत संबोधले जाते. असे विद्यार्थी इयत्ता नववीनंतर शिक्षण प्रवाहातून बाहेर फेकले जातात. जिल्ह्यातील जास्तीत जास्न विद्यार्थी प्रगत करण्याच्या उद्देशानेच जालना एज्युकेशन फाउंडेशनची स्थापना झाली आहे. फाउंडेशनमार्फत अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत करणारे पडो जालना हे अभियान राबविले जात असून, गेल्या बारा वर्षात आम्ही २०० पेक्षा अधिक शाळांसोबत ६० हजार विद्याथ्यांमध्ये पायाभूत साक्षरता वाढविण्यासाठी काम केले आहे. आतापर्यंत १.५० लाखाहून अधिक विद्याव्यांना आम्ही स्वतः बनविलेल्या गणित, मराठी आणि इंग्रजी या विषयाच्या कार्यपुस्तिका निशुल्क वितरित केल्या आहेत. या अभियानामुळे पायाभूत साक्षरता ३५ वरून ७० टक्क्यापर्यंत वाढविण्यात आम्हाला सफलता मिळाली आहे. आजघडीला असलेली शैक्षणिक बिकट परिस्थिती बदलण्यासाठी सामूहिक प्रयत्रांची गरज आहे.

२. मोफत कोचिंग प्रकल्पः सरकारी शाळांमधील आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी इयत्ता सातवी ते दहावी आणि अकरावी बारावी कॉमर्सचे मोफत कोचिंग क्लासेस चालवले जाते. दरवर्षी त्यात किमान ४०० विद्याथी लाभ घेतात. गेल्या सात वर्षात दोन हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी कोचिंग योजनेचा लाभ घेतला असून त्यापैकी २५ गुण अधिक विद्यार्थ्यांनी प्रतिष्ठित वैद्यकीय अभियांत्रिकी आणि वाणिज्य अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविलेला आहे.

३. मोफत बेसिक कम्प्युटर, टॅली व इंग्लिश स्पीकिंग कोर्स फाउंडेशन तर्फे मोफत बेसिक कॅम्पुटर, टॅली प्रशिक्षण, इंग्लिश स्पिकिंग हा प्रकल्प चालविण्यात येत असून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्याचा प्रयत्र सुरु आहे.

४. सायन्स सेंटर (विज्ञान शोधवाटीका): विज्ञानातील संकल्पना अधिक सोप्या आणि स्पष्ट व्हाव्यात या उद्देशाने गेल्या दोन वर्षापासून सायन्स सेंटर अर्थात विज्ञान शोधवाटिका हा उपक्रम सुरू केला आहे. आतापर्यंत एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सायन्स सेंटर मध्ये येऊन स्वतःच्या हाताने प्रयोग केले आहेत.

५. इंग्रजी मराठी शब्दकोश कार्यक्रमः विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती दूर व्हावी या दृष्टीने इंग्रजी शब्द पाठांतर स्पर्धा घेतली जाते. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांला मोफत इंग्रजी डिक्शनरी वाटप केली जाते. त्यातील अडीच हजार शब्दावर परीक्षा घेतली जाऊन बक्षीस चे प्रदान केले जातात. दरवर्षी आठ हजार विद्यार्थी त्यात सहभागी होतात.

६. विद्यार्थ्यांना सायकल वाटप उपक्रम अनेक विद्यार्थी दूरवरून कोचिंगसाठी येतात. गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना दरवर्षी सायकल वाटप करण्यात येतात.

७. मध्यान्ह भोजन योजनाः जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या मोफत कोचिंग प्रकल्पात दरवर्षी कुमार ४०० विद्यार्थी असतात. त्यापैकी अनेकजण दूरवरून येतात तर काही ग्रामीण भागातूनही येतात. शाळा सुटल्यानंतर थेट कोचिंगला येतात. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविण्यात येते.

### बंद काळात ...

बाळगण्याचे तसेच स्थानिक परिस्थितीचा विचार करून व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठाने बंद ठेवावी की नाही, याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे, असे नमूद करून शांतता व सौहार्द टिकवून ठेवण्याचे आवाहन महासंघाने सर्व व्यापारी बांधवांना केले आहे.

### अपर जिल्हादंडाधिकारी ...

मानवंदना देण्यासाठी नागरीक मोठ्या प्रमाणात पुणे येथील जयस्तंभ भिमा कोरेगाव येथे जातात. सदर सण उत्सवाचे अनुषंगाने जालना शहरात व जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित होतात.

तसेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण बचाव व धनगर समाज एस. टी. प्रवर्गात समाविष्ठ करावे या अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध प्रकारचे आंदोलन कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

तसेच महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द गटबाजी व आरोप प्रत्यारोप विविध कारणांवरुन सुरु आहेत. तसेच शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी विविध संघटनाकडून आत्मदहन,उपोषण, धरणे मोर्चे, निर्दशने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारतायेत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.

तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही.

हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि.२१ डिसेंबर २०२४ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ४ जानेवारी २०२५ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांना उबदार कानटोप्या वाटप

**जालना | प्रतिनिधी -** महावीर इंटरनॅशनल केंद्र जालना शाखा तर्फे येथील गायत्री विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थ्यांना थंडीपासून संरक्षणासाठी उबदार कानटोप्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला महावीर इंटरनॅशनल केंद्र जालना चे अध्यक्ष वीर सुगनचंद भंडारी, कोषाध्यक्ष वीर हरीश केनिया, केंद्राचे सदस्य वीर नारायण भरतीया, वीर दिनेश बरलोटा, गायत्री विद्यामंदिर शाळेचे प्रशासकीय अधिकारी देविदास हुरसाड, हिंदी माध्यमाच्या मुख्याध्यापिका रेखा करनेवार, मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका दीपिका जल्लेवार आणि शिक्षक उपस्थित होते.

याप्रसंगी वीर सुगनचंद भंडारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानवी जीवनातील सामाजिक कार्याचे महत्त्व समजावून सांगितले. मुले ही आपल्या देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. थंडीच्या दिवसांमध्ये होणाऱ्या त्रासाची जाणीव ठेवून आम्ही उबदार कानटोप्या वाटपाचा उपक्रम राबवत आहोत. महावीर इंटरनॅशनल केंद्र जालना नेहमीच गरजूंना मदत करण्याचा प्रयत्न करत असते. शिक्षणाच्या प्रवासात विद्यार्थी निरोगी राहतील, तरच त्यांचे शैक्षणिक आयुष्य अधिक समृद्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्याध्यापिका रेखा करनेवार व मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका दीपिका जल्लेवार यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका मंजुषा जामगे यांनी केले. महावीर इंटरनॅशनल केंद्र जालना च्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले तसेच समाजकार्याचा आदर्श उभा केला.




कर्तबगार नेत्याला मंत्रीपद का नाही ? सोशल मीडियावर नाराजी व्यक्त

# महाराष्ट्रात लोणीकरांची सर्वोत्तम कामगिरी - कैलास बोराडे

**मंठा | प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजीमंत्री बबनराव लोणीकरांना मंत्रीपद न दिल्याने कार्यकर्ते नाराज झाले आहेत. महाराष्ट्रात सर्वोत्तम कामगिरी असलेल्या कर्तबगार नेत्याला मंत्रीपद का नाही ? असा भावनिक प्रश्न माजी नगराध्यक्ष तथा भाजपाचे माजी शहराध्यक्ष कैलास बापू बोराडे यांनी उपस्थित केला असून सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

लोणीकर यांची ख्याती कर्तबगार नेता, कार्यतत्पर मंत्री, महाराष्ट्रात सर्वोत्तम कामगिरी, स्वच्छता खात्यात देशात नंबर एकचे कार्य, अनुभवी मंत्री, शब्द हेच प्रमाण, पक्षाच्या पडत्या काळात पक्षाशी एकनिष्ठ, पक्ष संघटनेच्या कार्यात स्वतःला झोकून देणारा एकमेव नेता, मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याची धमक, कायम जनतेत जाऊन जनतेची कामे करणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. मात्र एवढा मोठा अनुभव असताना सुद्धा मंत्रिमंडळात लोणीकर यांना स्थान न दिल्याने मतदारसंघातील कार्यकर्ते भावनिक झाले आहेत.



कैलास बापू बोराडे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे लक्ष वेधले आहे.

# माऊली अर्बन पतसंस्थेला बँको पुरस्कार जाहीर

**मंठा | प्रतिनिधी -** सहकार क्षेत्रात वेगळा ठसा उमटणाऱ्या मंठा तालुक्यातील माऊली अर्बन को-ऑप क्रिडेट सोसायटी लिमिटेड मंठा सन २०२४ या वर्षाचा बँक ब्ल्यू रिबन पुरस्कार २०२४जाहीर करण्यात आला आहे सदर पुरस्कार दिनांक २९, ३० व ३१ जानेवारी २०२५ रोजी आंबी सिटी लोणावळा येथे आयोजित कार्यक्रमात दिला जाणार आहे.



सहकार क्षेत्रातील बँका व पतसंस्था त्याच्या कार्यास प्रोत्सान मिळावे याकरिता सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या अवीज पब्लिकेशन कोल्हापूर या संस्थेमार्फत हा पुरस्कार जाहीर झाला आहे अवीज पब्लिकेशन कोल्हापूर ही संस्था सहकार क्षेत्रातील देशपातळीवर एक मार्गदर्शन संस्था म्हणून काम करते हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री सतीशराव निर्वळ यांनी समाधान व्यक्त करत पुरस्काराचे श्रेय भागधारक, सभासद,हितचिंतक, ग्राहक,अधिकारी तसेच कर्मचारी यांना दिले आहे भविष्यात ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विविध प्रकारच्या सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याचे अभिवचन दिले आहे. मंठा तालुक्यासह जिल्ह्यातील नावलौकिक असणारी व आपल्या स्वच्छ कामकाजासाठी प्रसिद्ध असणारी माऊली अर्बन को -ऑप क्रिडेट सोसायटीला उत्कृष्ट कामगिरीसाठी यापूर्वी अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे यावर्षी बँकॉ पुरस्काराने सम्मानित करण्यात आले आहे.आर्थिक निकषानुसार पतसंस्थेचे एनपीएचे प्रमाण तसेच सी एस आर चे प्रमाण आदी निकषांमध्ये माऊली अर्बन को -ऑप क्रिडेट सोसायटी मर्यादित मंठा जिल्हा जालना पात्र ठरली असल्याकारणाने सन २०२४ या वर्षाचा बँको ब्लु रिबन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे

# डॉ. आंबेडकर हे आमची अस्मिता; हजार गुन्हे दाखल झाले तरी संविधानिक मार्गाने आंदोलने करु - संजोग हिवाळे

**जालना | प्रतिनिधी -** देशाचे गृह मंत्री अमित शाह यांनी डॉ . बाबासाहेब आंबेडकर याच्या बद्दल केलेल्या वक्तव्यचा आम आदमी पार्टीचे वतीने अमित शहा यांचा बॅनरला जोडे मारून निषेध करण्यात आला. त्यामुळे आम आदमी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. याची माहिती मिळताच संजोग हिवाळे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही आमची अस्मिता आहे, त्यांचा अवमान कदापि सहन केल्या जाणार नाही. त्यासाठी हजार गुन्हे दाखल झाले तरी आम्हाला फरक पडणार नाही आम्ही संविधानिक मार्गाने आंदोलने करू.

श्री हिवाळे पुढे म्हणाले की, आम्ही लेखी निवेदन देऊन निषेध आंदोलन करणार असल्याची माहिती संबंधित पोलिसांना दिली होती. त्यांनी मूक परवानगी देऊ केली होती. तसेच आम्हाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे आणि तो अधिकार आम्हाला डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने दिलेला आहे. डॉ . बाबासाहेब आंबेडकर ही आमच्यासाठी अस्मिता आहे व या अस्मितेचा अपमान आम्ही सहन करणार नाही. त्यानी परवानगी दिली असती किंवा नसती तरी पण आम्ही आमचा निषेध नोंदविला असता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील श्री हिवाळे यांनी टोला लगावला. देवाभाऊ यांना असे म्हणायचे आहे का? त्यांची मातृसंस्था राष्ट्रीय सेवक संघ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदु कोड बिल संसदेत प्रस्ताव आणला होता. त्यावेळी राष्ट्रीय स्वयं सेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी डॉ. आंबेडकर हयात असतांना त्याचा प्रतिकात्मक पुतळा जाळला होता. हे बिल पारित होण्यापासून रोखले होते. हे बिल पास न झाल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी राजीनामा दिला होता. हे कधीही भारतीय जनता पार्टी सांगणाराही याची वाच्यता करणार नाही असेही श्री हिवाळे म्हणाले.




डॉ. आंबेडकर यांचा जाणून बुजून अवमान करायचा व दुसऱ्याला नावे ठेवयाची. डॉ. आंबेडकर यांचा अपमान झाला याबद्दल कोणीही आंदोलन करू शकतो त्यासाठी देवाभाऊंनी परवानगी नाकारली असावी असे वाटत असल्याचेही ते म्हणाले. संविधानिक आंदोलन करणाऱ्याला तुम्ही रोखू शकत नाही, देवा भाऊ असे १००० हजार जरी गुन्हे दाखल झाले तरी आम्ही आमच्या डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करणाऱ्याला कायम संविधानिक मार्गाने विरोध करू, जर का अमित शाह यांनी माफी न मागितल्यास येणाऱ्या काळात जर का अमित शाह यांचा जालना दौरा असेल त्यांना काळे झेंडे दाखवून विरोध करत राहू. अशी प्रतिकिया संजोग हिवाळे यांनी मीडियाशी बोलताना केली.

# केंद्रीय गृहमंत्री शहा यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ शिवसेनेची तीव्र निदर्शने

**जालना | प्रतिनिधी -** देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी केलेल्या कथित अवमानकारक उल्लेखाचा जालना जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मस्तगड येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर प्रचंड घोषणाबाजी व निदर्शने करून शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या नेतृत्वात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले,संघटक विजय पवार, माजी नगरसेवक गंगुताई वानखेडे, जे.के.चव्हाण, संजय रत्नपारखे, रवीकांत जगधने, डॉ.राजेश राऊत आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांसमोर बोलताना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, ज्या महामानवाने देशाची राज्यघटना लिहिली व देशातील सर्व जाती धर्माच्या तमाम देशवासीयांना समान अधिकार मिळवून प्राप्त करून दिले. त्यांच्याविषयी अमित शहा यांनी केलेले वादग्रस्त व अवमानकारक वक्तव्य हे अत्यंत दुर्दैवी आहे. अशा प्रकारचे वक्तव्य करून त्यांनी त्यांच्या मनातील या महामानवासंबंधीची भावना बोलून दाखवलेली आहे. पतप्रधानांनी अशा वक्तव्याची दखल घ्यावी. अशी जोरदार मागणी यावेळी पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केली. यावेळी रविकांत जगधने, संदीप झारखंडे, संदीप नाईकवाडे, चेतन भुरेवाल, अनिल अंभोरे, सखावत पठाण, दर्शन चौधरी, सोनाजी खांडेभराड, किशोर नरवडे, गणेश लाहोटी, जान मोहम्मद कुरेशी, वसंत घुगे,तुकाराम भुतेकर, रामेश्वर कुरील, संतोष क्षत्रिय, सनी साठे, श्रीनिवास उगले, प्रल्हाद पवार, जावेद सय्यद, योगेश जाधव, रमेश तुंगेवार, नरेश जगधने, शिवा मुळे, विठ्ठल पाऊलबुद्धे, राम कुलथे, वसीम खान, सचिन वानखेडे, चैतन्य मोकळे, राजेश इंगळे यांच्यासह आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





**नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशनादरम्यान माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफीचा मुद्दा मांडून शेतकऱ्यांचा आवाज विधिमंडळात बुलंद केल्याबद्दल जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासकीय संचालक प्रा सहदेव मोरे पाटील व सहकाऱ्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर पुष्पगुच्छ देऊन आमदार लोणीकर यांचा सत्कार केला.**

## अमित शहांच्या वक्तव्याच्या विरोधात शिवसेनेचे निषेध आंदोलन

**घाटकोपर -** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याच्या विरोधात त्याच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे घाटकोपर पश्चिम विधानसभेच्या वतीने काल शुक्रवारी भीम नगर,सर्वोदय जंक्शन येथे निषेध आंदोलन करण्यात आले.यावेळी माजी नगरसेवक शिवभक्त संजय भालेराव तसेच घाटकोपर पश्चिम विधानसभेतील सर्व महिला,पुरुष पदाधिकारी,अंगिकृत संघटनेचे पदाधिकारी,युवासेना,युवतीसेना आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावधान! राज्य लॉटरी बंदीची लवकरच शक्यता !

## विक्रेते, वितरक, ग्राहक यांना सतर्कतेचे आवाहन

**मुंबई | प्रतिनिधी -** गेल्या पाच दशकांहुन अधिक काळ महाराष्ट्राच्या अर्थकारणात ग्राहक, विक्रेते आणि सरकार यांच्या अर्थकारणात महत्त्वाची मोलाची कामगिरी बजावणारी राज्य लॉटरी अखेर बंद करण्याचे प्रयत्न हे प्रशासकीय स्तरावर वेगाने सुरू झाले असून लॉटरी उद्योगावर अवलंबून असणाऱ्या सार्यांनीच सतर्क राहावे असे कळकळीचे आवाहन लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते विलास सातार्डेकर यांनी केले आहे.



बदलत्या काळात राज्य लॉटरी समोर अनेक पर्याय हे उभे राहिले आहेत त्याचा परिणाम राज्य लॉटरीच्या विक्रीवर पडणे हे तसे स्वाभाविक आहे परिणामी लॉटरीची विक्री मंदावली आणि प्रशासकीय स्तरावर राज्य लॉटरीच बंद करण्याच्या हालचालींना वेग आला. दुर्दैवाने लॉटरी बंदचा निर्णय हा नव्या सरकारने घेतला तर राज्यभरातील विक्रेते आणि त्यांच्यावर अवलंबून उद्योगधंदे व कुटुंबिय यांच्यावर बेरोजगारीचे संकट अटळ आहे त्यामुळे सर्वानी या संभाव्य निर्णयाविरुद्ध अग्रक्रमाने उभे राहावे तसेच हा कुटील डाव उधळून लावावा असे आवाहन सातार्डेकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विक्रमी विक्रीसाठी विक्रेता संघटना नेहमीच विविध उपक्रम राबविते सर्वाधिक विक्री करणाऱ्या विक्रेत्यासाठी कुपनाद्वारे विविध योजना;बक्षिसांवर बक्षिसे;भेटवस्तू, ईत्यादी कार्यक्रम आजवर हाती घेण्यात आले आहेत, अशी माहिती सातार्डेकर यांनी दिली. राज्यातील हजारो लॉटरी विक्रेते आणि त्यांच्या लाखो कुटुंबियांनी एकजुटीने संघटनेच्या सोबत अग्रक्रमाने उभे राहावे असेही त्यांनी स्पष्ट केले.

**शिवसेनाप्रमुखांचा इशारा आजही दिशादर्शक**

१९९७ साली महाराष्ट्र शासनाने लॉटरी बंद करण्याचा डाव रचला होता पण तो डाव हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या एका ईशाऱ्यामुळे राज्यशासन आणि न्यायालय यांना मागे घ्यावा लागला महसूलाच्या स्वार्थपेक्षा शासनाने लाखोंच्या उपजीवेकाचा विचार आधी करावा. गरिबांची रोजीरोटी बुडविण्याची अवदसा कुणाला आठवली तेच कळत नाही लॉटरी बंद झाली तर गुन्हेगारी वाढेल असाही जाहीर सज्जड दम शिवसेनाप्रमुखांनी दिला होता तेच पुन्हा एकदा देण्याची वेळ आली आहे असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या बंदीच्या विरोधात आता सर्वानीच राज्याचे अर्थ सचिव, लॉटरी आयुक्त, मुख्यमंत्री यांच्याशी पत्राद्वारे, ईमेल द्वारे संपर्क साधून आपला निषेध नोंदवा असे आवाहन लॉटरी संघटनेतर्फे करण्यात आले आहे. विक्रेते, ग्राहक, वितरक, विक्रेत्यांचे कुटुंबिय या सार्यांनी यासाठी पुढाकार घ्यावा असेही सूचित करण्यात आले.

# घर घर संविधान पोहोचवण्याचा माणगाव तालुक्यातील शिक्षकांनी केला निर्धार

## शिक्षक शालेय दैनंदिन परिपाठातून विद्यार्थ्यांसमोर संविधानाचे अंतरंग उलगडणार

**बोरघर | माणगाव | प्रतिनिधी -** 'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घर घर संविधान पोहोचवण्यासाठी माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील मुख्याध्यापकांची कार्यशाळा गोरेगाव व माणगाव येथे दोन टप्प्यात गटशिक्षणाधिकारी श्रीमती सुरेखा तांबट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या दरम्यान श्रीमती सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांच्या संकल्पनेतून 'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. या दरम्यान सुचवलेले सर्व उपक्रम स्वयंस्फूर्तीने प्रभावीपणे राबवून घर घर संविधान पोहोचवण्याचा निर्धार उपस्थित सर्व शिक्षकांनी आपला हात उंचावून केला.

सदर कार्यशाळेत मार्गदर्शन करताना संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी संविधान म्हणजे नक्की काय आणि ते समजून घेण्याची आवश्यकता का आहे, याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. संविधानाच्या माध्यमातून आपण आपला देश कसा बनवणार आहोत आणि आपल्या देशातील सर्व नागरिकांना काय देणार आहोत, याविषयी सविस्तर मांडणी केली. ठरलेल्या नियोजनानुसार आज कार्यशाळेत संविधानाविषयी मिळालेली माहीती उपस्थित शिक्षक आपल्या शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना देणार असून ऐकलेली माहीती विद्यार्थी आपल्या पालकांना सांगणार आहेत. उद्यापासून संविधानाविषयी रोज परीपाठादरम्यान संविधानाचे अंतरंग उलगडणारी माहीती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. ही माहिती संकलित करून तालुक्यातील सर्व शाळांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांना सोपविण्यात आली आहे.

'घर घर संविधान' ह्या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सुचवलेल्या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी करून माणगाव तालुक्याचा एक आदर्श पॅटर्न बनवण्यासाठी सर्व शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी श्रीमती सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी माणगाव यांनी केले. या कार्यशाळेस विस्तार अधिकारी कुमार खामकर, धूळदेव कोळेकर, सर्व केंद्र प्रमुख, सर्व साधन व्यक्ती, व माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक व प्रसार माध्यम प्रमुख अनिल नाचपल्ले उपस्थित होते.



# शेतकऱ्यांकडून पैसे लाटण्याचा प्रयत्न!

## एचडीएफसी ॲग्रो इन्शुरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करुन त्यांना निलंबीत करण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** सन २०२३ मधील अंबिया बहार फळपिक विमा रिजेक्ट झालेला असतांनाही कृषि अधिकारी जालना व एच.डि.एफ. सी. ॲग्रो इन्शुरन्स कंपनी चे अधिकारी पैशाची देवाण घेवाण करून रिजेक्ट झालेला विम्याचे फॉर्म पास करून शेतकरयांकडून पैसे लाटण्याचे प्रयत करणारे अधिकारी यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन जालना जिल्हाधिकारी यांना जय बजरंग फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्याकडून देण्यात आले.

या निवेदनात जालना जिल्हयातील शेतकऱ्यांची कृषि अधिकारी व एच.डी. एफ. सी ॲग्रे इन्शुनरन्स कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून होणार लुट तात्काळ थांबविण्यात यावी शासनाच्या पैशासंबंधी अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून शासनाच्या पैशाची गैरम ार्गाने मोठ्या प्रमाणात लुट चालू आहे. याकडे शासनाने तात्काळ सखोल चौकशी करून या गंभीर विषयावर जातीने लक्ष दयावे. एकाच गटातील एका शेतकऱ्यास विम्याचे पैसे मिळाले आहे, परंतू त्याच गटातील दुसऱ्या शेतकऱ्याला पिक विम्याचे पैसे मिळत नाही हा बोगस प्रकार चालू आहे, जो तात्काळ थांबवावा. वरील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याकडून पैसे उकळले आहेत.

तसेच जिल्हाधिकारी यांनी कृषि अधिकारी व एच.डी.एफ. सी. ॲग्रोइन्शुरन्स कंपनीचे अधिकाऱ्यांवर गांभीर्याने विचार करून तात्काळ कार्यवाही करुन त्यांना निलंबीत करण्यात यावे नसता जय बजरंग फाऊडेशनच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात जय बजरंग फाऊंडेशनच्या वतीने देण्यात आले. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष विपुल सत्यजित राय, संस्थापक उपाध्यक्ष विनोद तान्हाजीराव राऊत, सचिव अशोक पडूळ, जालना जिल्हाध्यक्ष उमेश शेषराव कुटे, सचिन घोडे, अश्विन ससाणे, किशोर घुगे, महावीर चव्हाण आदींचे स्वाक्षऱ्या आहेत.

# बांधकाम कामगारांचे मंडळ ठेकेदाराच्या घशात घालण्याचे काम बंद करा

## बांधकाम कामगारांचे नोदणी, नूतनीकरण, लाभाचे अर्ज भरण्याचा अधिकारी नोदणीकृत केंद्रीय संघटनांना द्या

**जालना । प्रतिनिधी -** सिटू संलग्न लालबावटा बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने आज दि.२० डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करून कामगार विरोधी महायुती सरकारचा निषेध करण्यात आला. काम गार कल्याण मंडळ वाचवा, दिवाळीपूर्वी जाहीर केलेले बोनस त्वरित वाटप करा, कामगार नोंदणीचे अधिकार केंद्रीय कामगार संघटनांना द्या, अशा घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. व विविध मागण्याचे निवेदन मा. निवासी जिल्हाधिकारी साहेबांना देण्यात आले व त्या निवेदनात म्हटले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम काम गार कल्याणकारी मंडळ, हे मंडळ बांधकाम व त्याच्याशी संबंधित कामगारांना विविध लाभ व सुरक्षा देण्यासाठी स्थापन झालेले आहे. काम गाराना घरबसल्या नोदणी करण्यात यावी या अनुषंगाने ऑनलाईन नोदणी प्रक्रिया या मंडळाने स्वीकारली त्यातून बऱ्याच कामगारांना नोदणी करणे सोपे झाले. लाभ घेणे सोपे झाले,आणि आता आचारसंहिता संपल्यावर मंडळाने तालुकानिहाय काम गार सुविधा केंद्र सुरू करून ते खाजगी कंपनीला कंत्राट दिले. आणि कामगारांच्या हक्कच पैसा हा ठेकेदाराच्या घशात घालण्याचे काम मंडळाने चालवले आहे, आणि ज्या कामगार संघटनानी कामगारांसाठी मंडळ लागू करण्यासाठी सातत्याने संघर्ष केला. त्यांचे देखील नोदणी करण्याचे अधिकार कमी करण्याचे काम या ठेकेदार धार्जिणे प्रशासनाने केले आहे.

परंतु प्रशासनाच्या या निर्णयामुळे खऱ्या कामगारांना मोठ्याप्रमाणात नुकसान सहन कराव लागणार आहे. त्यांना त्यांची रोजंदारी बुडवून सुविधा केंद्राच्या चकरा म ाराव्या लागणार आहेत.त्याम ुळे खरे कामगार नोदणीच करणार नाहीत, आणि ते मंडळाच्या सोई सुविधांपासून वंचित राहतील.यामुळे पुन्हा एकदा सुविधा केंद्रा भोवती दलालांचा विळखा पाहायला मिळणार आहे.म्हणून नोंदणीकृत केंद्रीय कामगार संघटनांना नोंदणीचे अधिकार द्या. दलालांकडून कामगारांची लूट बंद करण्याचे कारण दाखवून मंडळाने हा निर्णय घेतलेला आहे परंतु या सुविधा केंद्रामार्फतच मोठ्या प्रमाणात दलाल पोसल्या जाण्याची दाट शक्यता आहे.

त्याचबरोबर जालना शहरातील कामगारांचे




नोंदणी आणि नूतनीकरणाची अर्ज मंडळांनी सांगितलेल्या कागदपत्रासह दाखल केले गेले आहेत परंतु जालना येथील नोंदणी अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक कामगाराचे अर्ज रद्द केले आहेत. आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता केल्यानंतरही नोंदणी अधिकाऱ्यांना अर्ज रद्द करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. नको ते कारण देऊन हे अर्ज बाद केल्या गेले आहेत ते अर्ज त्वरित मंजूर करावेत अन्यथा त्या सर्व कामगारांना सोबत घेऊन आपल्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला.खालील मागण्या करण्यात आल्या.१) पूर्वीप्रमाणेच बांधकाम काम गारांचे नोंदणी, नूतनीकरण आणि लाभाचे अर्ज भरण्याचे अधिकार नोंदणीकृत केंद्रीय कामगार संघटना द्या.२) पूर्वीच्या लाभ, नूतनीकरण चे पेंडिंग अर्ज त्वरित निकाली काढा.३) जिल्ह्यातील पेंडिंग लाभाचे अर्ज जात्या तालुका सुविधा केंद्राकडे पाठवून एका महिन्यात निकाली काढा. लाभाची रक्कम कामगाराच्या खात्यावर त्वरित वर्ग करा. ४) विधानसभा निवडणुकीपूर्वी घोषित केलेल्या ५००० रुपये सानुग्रह अनुदान/ बोनसचा लाभ ताबडतोब अदा करा. ५) बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ खाजगी कंत्राटदाराच्या तावडीतून मुक्त करा, कल्याणकारी मंडळात नवीन कर्मचाऱ्यांची भरती करा.६) सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार कामगार संघटनांच्या मदतीनेच मंडळाचे कामकाज चालू ठेवा, त्यासाठी केंद्रीय कामगार संघटनाना नोदणी,नूतनीकरण व लाभाचे अर्ज दाखल करण्यासाठी मंडळाचा आयडी देण्यात यावा.७) जालना शहर व तालुक्यातील नवीन नोंदण व नूतनीकरणाचे अर्ज योग्य ती कागदपत्रे सलग्न करून ऑनलाइन पद्धतीने दाखल केले आहेत, पण विनाकारण ते अर्ज नोदणी अधिकाऱ्यांनी रद्द केले आहेत अर्ज त्वरित मंजूर करावेत.८) बांधकाम कामगारांसाठी त्वरित घरकुल योजनेची अंबळबाजवणी करा.९) ९० दिवस काम केलेल्या पत्रावर ग्रामसेवक स्वाक्षरी करत नाहीत त्यांना स्वाक्षरी देण्यासाठी आदेशित करा. यावेळी संघटनेचे सेक्रेटरी ड.अनिल मिसाळ, रवी भदर्गे, मधुकर एखंडे बाबसाहेब पाटोळे लक्ष्मण मोहिते फरिदा शेख महेबुब शेख, अर्चना कोरडे,बंडू लोखंडे, सुभाष काफरे, गणेश पवार, आरती भारसाखळे, रम ेश घुगे, सुरेखा कांबळे अशाम ाती जैद, सुनिता राऊत करण वंजारे, देविदास तेझाड, राहुल हनवते, सचिन गाडगे,अजय अग्रवाल, राजेभाऊ लहाने, पद्माबाई रगडे,कृष्णा रगडे यांच्यासह शेकडो कामगार निदर्शनात सहभागी होते.

युवा आदर्श

### तुळाधार ...

एक छत्र कारभारी
काम करी धुवांधार
सांभाळला डोलारा
जोखून रे तुळाधार
फुगवली छप्पनइंच
छाती ठोके भरदार
घर माझे एकट्याचे
नको तो किरायेदार
बदलली परिस्थिती
दिव्या खाली अंधार
आधार देता देताना
आता घेतात आधार
एकला चलोचा नारा
गळूनि पडला निर्धार
कालानुरूप बदलाव
वेगळा घेती सं प्रधार
रस्ता पाहू कधीकधी
करावा लागेल सुधार
लवचिकता महत्वाची
चुकते करायचे उधार
खरेमालक बंगल्याचे
लोकशाहीचा मतदार
राज्यशकट चालवता
जाण आहो चौकीदार
परिक्षा द्यावी स क्षमते
नेहमी रहावे खबरदार
पुन्हा सत्ता एक हाती
बदलूशकतो जनाधार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३११२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३११२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.